सहकारातूनसमृध्दीकडे

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

# सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय

५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

संकेतस्थळ: https://sahakarayukta.maharashtra.gov.in

**दिनांक १२/१२/२०२३**

## प्रसिद्धीपत्रक

सहकार विभागातील गट - क संवर्गातील सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत दिनांक १४/०८/२०२३ आणि दिनांक १६/०८/२०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती. त्यानुसार सदर कंपनीकडून प्राप्त झालेली उमेदवारांची सहकारी अधिकारी श्रेणी-१, सहकारी अधिकारी श्रेणी-२,सहाय्यक सहकारी अधिकारी/वरिष्ठ लिपिक व लेखापरिक्षक श्रेणी-२ या पदांची विभागनिहाय तात्पुरती गुणवत्ता यादी सहकार आयुक्त कार्यालयाच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर दि.११/१२/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सदर गुणवत्ता यादीतील उमेदवारांपैकी उपरोक्त पदांसाठी निवड करावयाचे उमेदवार व प्रतिक्षा यादीतील उमेदवार याप्रमाणे उमेदवारांची **तात्पुरती निवडसूची** सहकार आयुक्त कार्यालयाच्या उक्त अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

**या बाबत उमेदवारांसाठी सर्वसाधारण सूचना खालीलप्रमाणे :-**

(१) संबधीत विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे मार्फत, त्यांचे विभागामध्ये अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्रे पडताळणीसाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित रहाणेबाबत नोंदणीकृत डाक / ई-मेलद्वारे देखील कळविण्यात येईल.

(२) सदरची निवडसूची केवळ **तात्पुरती निवडसूची** असून,कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची विहीत पदाकरिता निवड झाली आहे असे समजण्यात येऊ नये. तात्पुरत्या निवडसूचीतील उमेदवारांच्या कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणी अंती उमेदवारांची अंतिम निवडसूची प्रसिध्द केली जाईल.

(३) तात्पुरत्या निवडसूचीतील उमेदवारांच्या कागदपत्रे पडताळणीनंतर उमेदवार सदर पदावरील निवडीसाठी अपात्र ठरल्यास गुणवत्ता यादीतील पुढील उमेदवारास कागदपत्रे पडताळणीसाठी बोलविण्यात येईल.

(४)सामान्य प्रशासन विभागाचे दि.२९/०५/२०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार दिव्यांग व्यक्तींसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण हे समांतर आरक्षण आहे. समांतर आरक्षण हे सामाजिक व खुला या दोन्ही भागात विभक्त होणारे आरक्षण आहे. परंतु दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षित पदे खुला किंवा सामाजिक आरक्षण प्रवर्गात दर्शविण्यात येत नाहीत. दिव्यांगासाठी राखीव पदे वेगळी दर्शविण्यात

येतात. दिव्यांगासाठी आरक्षित पदावर गुणवत्तेनुसार निवड झालेल्या उमेदवारांचा समावेश तो ज्या प्रवर्गाचा आहे त्या प्रवर्गातून करण्यात येतो. त्यानुसार निवड झालेला दिव्यांग उमेदवार ज्या सामाजिक प्रवर्गातील आहे. त्या सामाजिक प्रवर्गातील सर्वसाधारण या समांतर आरक्षणातील एक पद कमी करून ते दिव्यांग या समांतर आरक्षणातून भरण्यात येत आहे.

तात्पुरत्या निवडसूचीतील उमेदवारांच्या कागदपत्रे/प्रमाणपत्रे तपासणी पूर्ण झालेनंतर अंतिम निवडसूची प्रसिध्द करणेत येईल.

**उमेदवारांची कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीचे ठिकाण : -**

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, इमारत, ५ बी. जे. रोड, पुणे जिल्हा मध्यवर्ती, सहकारी बॅक लि. पुणे मुख्यालया जवळ, पुणे स्टेशन, पुणे. ४११००१

**तात्पुरती निवडसूचीतील उमेदवारांची कागदपत्रे/प्रमाणपत्रे पडताळणीबाबतचे विभाग निहाय वेळापत्रक खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | विभागाचे नाव | भरती करावयाच्या पदाचे नाव | पडताळणी करिता उमेदवाराने उपस्थित राहण्याची | |
|---|---|---|---|---|
| | | | दिनांक | वेळ |
| १. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण, नाशिक व विभागीय सहनिबंधक,सहकारी संस्था, (लेखापरिक्षण) नाशिक | सहकारी अधिकारी श्रेणी-१ | २६/१२/२०२३ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० |
| | | सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | |
| | | सहाय्यक सहकार अधिकारी/वरिष्ठ लिपीक | | दुपारी २.३० ते सायंकाळी ६.३० |
| | | लेखापरीक्षक श्रेणी-२ | | |
| २. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई, औरंगाबाद व कोल्हापूर | सहकारी अधिकारी श्रेणी-१ | २७/१२/२०२३ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० |
| | | सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | |
| | | सहाय्यक सहकार अधिकारी/ वरिष्ठ लिपीक | | दुपारी २.३० ते सायंकाळी ६.३० |
| ३. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, पुणे व लातूर | सहकारी अधिकारी श्रेणी-१ | २८/१२/२०२३ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० |
| | | सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | |
| | | सहाय्यक सहकार अधिकारी/ वरिष्ठ लिपीक | | दुपारी २.३० ते सायंकाळी ६.३० |
| ४. | सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,म.रा.पुणे | वरिष्ठ लिपीक | २८/१२/२०२३ | सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.३० |
| ५. | विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती व नागपूर | सहकारी अधिकारी श्रेणी-१ | २९/१२/२०२३ | सकाळी १०.०० ते दुपारी १.३० |
| | | सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | |
| | | सहाय्यक सहकार अधिकारी/ वरिष्ठ लिपीक | | दुपारी २.३० ते सायंकाळी ६.३० |

**(अनिल कवडे)**
**सहकार आयुक्त व निबंधक,**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**